अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३

**विषय क्रमांक : ३४** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे व दरमहा रक्कम १०% मानधनामध्ये वाढ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांनी दि. ०६/१२/२०२१ रोजी विनंती अर्ज देवून त्यामध्ये " रक्तपेढी विभागामध्ये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी रु. १६,०००/- दरमहा मानधनावर नियुक्ती असून सद्यस्थितीमध्ये कामकाजाचे स्वरुप पहाता व महागाईचा विचार करुन मानधनामध्ये योग्य ती वाढ करणेबाबत नमूद करुन मागणी केलेली आहे.

संबधितांच्या सदर मागणी अर्जाच्या अनुषंगाने इकडील जा. क्र. आस्था. ४१८९ दि. ३१/१२/२०२१ अन्वये मा. रक्तपेढी विभाग प्रमुख यांना पत्र देवुन सदर अर्जानुसार मानधनवाढ विषयी संदर्भात स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने मा. रक्तपेढी विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा. क्र. २०८ दिनांक ०५/०१/२०२२ अन्वयेच्या अहवालपत्रामध्ये " उपरोक्त विषयान्वये, सदर कर्मचारी हे रक्तपेढी विभाग येथे करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी नियुक्त आहेत, सदर कर्मचारी यांचे मानधनामध्येवाढ करण्याबाबत आपल्या स्तरावर निर्णय नियमानुसार घेणे उचित राहील." असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

रक्तपेढी विभाग यांचेकडील वेळोवेळी सादर झालेल्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा - सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी रु. १६,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.

संबधितांच्या अर्जाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये त्यांना देण्यात येणा-या मानधनामध्ये वाढ करणे झाल्यास सद्यस्थितीध्ये मनपाची आर्थिक बिकट परिस्थितीचा विचार होवून सदरचा देण्यात येणा-या दरमहा मानधनामध्ये १० % प्रमाणे वाढ करणे झाल्यास सदरची बाब ही आर्थिक स्वरुपाची धोरणात्मक बाब असल्याने सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची याबाबत पुर्व मान्यता घेणे संयुक्तीक होईल,

त्यानुषंगाने दरमहा मानधनवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अं.नं | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभागाचे नांव | सध्याचे देण्यात दरमहा मानधन रु. | १० % प्रमाणे प्रस्तावित मानधनवाढ दरमहा एकुण मानधन रु. |
|---|---|---|---|---|
| १ | लॅब टेक्निशियन | रक्तपेढी विभाग | १६,०००/- | १७,६००/- |

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील रक्तपेढी विभाग त्यांचेकडील जा. क्र. २०८ दिनांक ०५/०१/२०२२ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदावरील नियुक्तीकरीता वरील दर्शविल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १० % प्रमाणे मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत भरण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/ अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे"

प्रस्तावित लॅब टेक्नीयन पदी पुढील मुदवाढ देतात उपरोक्त शासन परिपत्रकाची अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपयुक्त (सा) यांचा अभिप्राय की,यापुर्वीची मानधनवाढ कधी दिली व सदर कर्मचारी यांनी पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणे बाबत विभाग प्रमुखांची शिफारस आहे काय ? अहवालासह सादर करा.

यावर मा.आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मा.फेरसादर,

प्रस्तुत प्रकरणांवरील मा. उपायुक्त (सा) यांचे दि. १४/१०/२०२२ रोजीच्या शेरांकनानुसार की, श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची यापुर्वी रक्तपेढी विभाग प्रमुख यांचेकडील प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक खंड देवून मा. स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्त ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी सहा - सहा महिन्यांकरिता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येत असून श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची यापुर्वी मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ५४ दिनांक १२/०१/२०१६ अन्वयेच्या ठरावानुसार रु. १३,०००/- या दरमहा मानधानावरून रु. १६,०००/- या दरमहा मानधनावर जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक १७२२ दिनांक १८/०६/२०१६ चे आदेशानुसार दि. ०६/०९/२०१६ पासुन मानधनामध्ये वाढ करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. १७७ दिनांक १७/११/२०२१ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची मानधनावरील नियुक्तीची मुदत दि. ०५/१/२०२२ रोजी पासून समाप्त होणार असल्याने तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्यांकरिता मानधनावर नियुक्ती बाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता, त्यानुषंगाने श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १५० दिनांक ११/०१/२०२२ अन्वयेच्या पारीत पुर्व मंजुर ठरावाच्या अनुषंगाने दि. ०८ / ०१ / २०२२ पासून पुढील सहा महिन्यांकरिता रु. १६,०००/- या मानधनावर पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त वरील अर्जाच्या अनुषंगाने व त्यावरील रक्तपेढी विभाग त्यांचेकडील जा. क्र. २०८ दिनांक ०५/०१/२०२२ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागामध्ये करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदावरील नियुक्तीकरीता प्रस्तावामध्ये

दर्शविल्यानुसार दरमहा मानधनामध्ये १०% प्रमाणे मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार व संबंधित कार्यरत विषयाप्रमुख यांचे कार्यालयीन कार्यक्षमता व सचोटीबाबतचे अहवाल घेवून कार्यवाही करणेस मा.स्थायी समितीसमोर करणेस मान्यतेस सादर.

मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती निर्णयास्तव पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर

--**--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

त्यानुसार विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- रक्त पेढी बाबत माहिती देण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- रक्त पेढी विभागाकडील लॅबटेक्नीशियन किती पदे भरलेली नाहीत.मानधनावरील कर्मचारी किती दिवस ठेणार.त्यांचा आस्थापना खर्च्र मंजुर आहे का? आस्थापना सुचीवर किती पदे मंजूर आहेत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- चार लॅब टेक्नीशियन पदे आहेत, एक कायम पद आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेमार्फत चालविल्या जाणा-या कोविड लसीकरणाच्या ठिकाणी डाटा एन्ट्री ऑपरेटर नसल्याने नागरीकांना वेळेत लस उपलब्ध होत नाही.बुस्टर डोस साठी नागरीक येतात,त्यांनाही लस मिळत नाही.लसीकरणाच्या डोस ची संख्या वाढविण्यात यावी.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- नियमीत लसीकरण चालू आहे.दैनंदिन ५० ते ६० आर.टी.पी.सी.आर चाचण्या होतात.दिनांक ०३/०६/२०२२ रोजी मा.शासनाने वाढत्या कोरोना प्रर्दुभावासाठी नविन मार्गदर्शक सुचना काढलेल्या आहेत.त्यांचा अभ्यास करून त्यानुसार पुढील काळामध्ये कोरोना नियोजनाची कार्यवाही करण्यात येईल.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोनाची वाढती रूग्णसंख्यापहाता मा.शासनाने पाच जिल्हयांमध्ये निर्बध आणले होते.अहमदनगर शहरामध्ये कोरोनाची प्रर्दुभाव वाढल्यास रूग्ण विलगीकरणासाठी कोणती सोय केली आहे.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- रूग्णांची संख्या वाढलीतर आपण १००० बेडची तयारी केलेली आहे.

मा.सभापती साहेब :- लॅब टेक्नीशियन ,डाटा एन्टी ऑपरेटर यांची संख्या वाढवा.जास्तीत जास्त नागरीकांचे लसीकरण तसेच बुस्टर डोस वाढविण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिके मार्फत उभारण्यात येत असलेला ऑक्सीजन प्लॅन्ट चे काया झाले?

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.गाडळकर :- ऑक्सीजन प्लॅन्ट उभारणीचे काम पुर्ण झाले आहे. प्लॅन्ट चालू झालेला नाही.परवानगी घेणे बाकी आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- प्लॅन्ट चालू करण्यासाठी लागणारी परवानगी मीळालेली नाही.परवानगी मिळाल्यानंतर चालू होईल.

मा.सभापती साहेब :- कमीत कमी एखादी टाकी ऑक्सीजन करून पहा. प्लॅन्ट चालतोय का ते पहा.लक्ष देवून काम करून घ्या.कोरोना संपल्यानंतर त्याचा उपयोग होणार नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- किती दिवसांमध्ये काम होईल?

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.गाडळकर :- १५ दिवसांमध्ये काम पुर्ण होईल.

मा.सभापती साहेब :- नाही झाले तर जबाबदारी कोण घेणार? ठेकेदाराचे पेमेंट दयाचे राहिल आहे का? काम लवकरात लवकर करणे आवश्यक आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.गाडळकर :- १५ दिवसांमध्ये परवागीचे काम पुर्ण करण्यात येईल.

मा.श्री.गणेश कवडे :- बुस्टर डोस,कोणा कोणाला दिला जातो.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे:- ६० वर्षा वरील जेष्ठ नागरीक ,गंभीर आजारी असणारे नागरीक दुसरा डोस देवून नउ महिन्याचा कालावधी झालेले नागरीक यांना बुस्टर डोस दिला जातो. मा.शासनाच्या आलेल्या नविन गाईड लाईन नुसार सुधारीत कार्यक्रम राबविण्यात येईल.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे व दरमहा रक्कम १०% सध्याच्या मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लावी दगडु यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे व दरमहा रक्कम १०% सध्याच्या मानधनामध्ये वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

**विषय क्रमांक : ३५** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक या पदी श्री.संदिप प्रभाकर पुंड व इतर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा. क्र. ३६४ दि. १७ /०३/२०२२ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. ३६४ दि. १७/०३/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) मनिष कैलास सोनवणे २) संदिप प्रभाकर पुंड ३) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. २८/०८/२०२१ ते २७/०२/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि. २८ / ०२ / २०२२ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने पाणी विभागामध्ये मोठ्याप्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने संबधितांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील नियुक्तीबाबत " नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १४९ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ३९७ दि. ०४/०२/२०२२ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड २) मनिष कैलास सोनवणे ३) गहिनीनाथ अंबादास मेने यांची रु. १४,०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि. २८/०८/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि. २८/०२/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची तात्पुरत्या स्वरुपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०३/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सादर करणेकरिता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप प्रभाकर पुंड | विजतंत्री | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | मनिष कैलास सोनवणे | विजतंत्री | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | १४,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ मुलेअ/ मुलेप यांचा अभिप्राय घ्यावा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करणेत यावे.

प्रस्तावित विजतंत्री पंपचालक पदी पुढील नियुक्ती देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,Throgh AMC

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अं.ले.प.यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपयुक्त(सा) यांचा अभिप्राय की,पा.पु.विभागाचे दि.१७/०३/२०२२ चे शिफारशिनुसार व "अ" मधील आस्था.विभागाचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाहीसाठी मान्यतेस्त सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.,

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- पिंपळगांव जागे बाबत काय झाले.

उदयान विभाग प्रमुख श्री.नजान :- पिंपळगांव माळवी येथील पंपीग स्टेशन जवळील झाडे तोडल्या बाबत सामाजीक वनीकरण विभाग यांचे मार्गदर्शन घेवून पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.माझी मानसिक परीस्थीती ठीक नसल्यामुळे तक्रार नोंदवितांना माझ्याकडून काही गोष्ट नमुद करणे राहून गेलेले आहे.तरी पुन्हा सुधारीत अर्ज / तक्रार नोंदवून त्यामध्ये नविन कलमा नुसार गुन्हा नोंद करून घेतो.

मा.श्री.शेख मुदस्सर :- रितसर गुन्हा नोंदवून जबाब देवून संबंधीतावर कठोर कारवाई होईल अशी फिर्याद देण्यात यावी.

मा.श्री.गणेश कवडे :- योग्य कलम टाकून व्यवस्थीत कायदेशी तक्रार केल्यास संबंधीताला शिक्षा झाल्यास पुन्हा कोणी असे धाडस करणार नाही.

मा.सभापती साहेब :- आपल्या महानगरपालिकेच्या पॅनेल वरील वकीलांनी व्यवस्थीत मार्गदर्शन करून कायदे ,कलम व्यवस्थीत फिर्यादीमध्ये टाकून पोलीस स्टेशनला जावून एफ.आय.आर .दाखल केली पाहिजे.

महानगरपलिका विधीज्ञ श्री.बाबर :- सदर बाबतची एफ.आय.आर.दाखल करणेची कोणतील कागदपत्रे माझ्याकडे आलेली नाहीत.आम्हाला पुर्ण माहिती दिली गेली नाही.

मा.सभापती साहेब :- पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल करणे करीता गेले असता ,पोलीसांनी म्हणणे देखल ऐकुण घेतले नाही.सामाजीक वनीकरणाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.महानगरपालिकेच्या पॅनेल वरील वकीलांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे.सदर फिर्यादी मध्ये पुन्हा वाढीव कलम दाखल करण्यात यावेत.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :-कायदेशीर भाषेत तक्रार तयार करून कंम्प्लेट करणे आवश्यक आहे. महानगरपालिका विधीज्ञ पॅनेल वरील ॲड.महेश काळे तुम्ही कायदेशीर तक्रार तयार करून दया.

महानगरपालिका पॅनेल विधीज्ञ श्री.काळे :- संपुर्ण कागदपत्रे प्रकरण दया मी कादेशीर रितसर तक्रार तयार करून देतो.फक्त पोलीस स्टेशन ला दाखल करण्याकरीता अम्हाला जाता येणार नाही.

उदयाप विभाग प्रमुख श्री.नजान :- सदर प्रकरणा बाबत सामाजिक वनीकरण विभागाला दोन वेळा पत्र देवूनही त्यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

मा.सभापती साहेब :- पॅनेल वरील वकीलांमधर्फत कायदेशीर पध्दतीने अर्ज तयार करून वाढीव कलम लावा.

मा.श्री.विनीत पाउलबुधे:- पॅनेल वरील वकील श्री.काळे यांचे कडून तक्रार तयार करून दाखल करून घ्या.३५३ दाखल करा.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- ३५३ दखल करता येणार नाही,३७९ दाखल करावी लागेल.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक या पदी श्री.संदिप प्रभाकर पुंड व इतर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक या पदी श्री.संदिप प्रभाकर पुंड व इतर यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

**विषय क्रमांक : ३६** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** कार्यालयीन खर्च ( बाहय यत्रंणा ) अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभागाकरीता विविध कामासाठी आर्किटेक्ट पॅनल नेमणे-ई.निविदा क्र.७२८९२० सन २०२१-२२ या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

संदर्भ :- १.मा.आयुक्त यांचे दि.९/२/२०२२ चे मान्यतेने
२.इकडील पत्र क्र.सां.बा.२७२० दि.१६/२/२०२२
३.श्री.अजय ठाकुर,औरंगाबाद यांचे दि.१६/२/२०२२ रोजीचे पत्र
४.इकडील पत्र क्र.सा.बा.२७९३ दि.२२/२/२०२२
५.मे.अविष्कार ग्रुप अ.नगर यांचे दि.२५/२/२०२२ रोजीचे पत्र

मा.फेरसादर,

विनंती रिपोर्ट की, उक्त विषयांकित कामाबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे

| ई -निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ कार्यालयीन खर्च (बाह्ययंत्रणा) अंतर्गत आर्किटेक्ट पॅनेल नेमणे | | अजय ठाकुर& असोसिएटस,औ.बाद | १.९५% | अजय ठाकुर& असोसिएटस,औ.बाद -- प्रकल्प किंमतीच्या १.९५% |
| | | अविष्कार ग्रुप | २.५२% | |
| | | डि ओ निकम आर्किटेक्ट &प्रोजेक्ट मॅनेजमेंट | १.९७% | |

विषयांकित कामाबाबत ३ ही निविदाधारकांना संदर्भिय क्र.२ व ४ नुसार दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता १. अजय ठाकुर& असोसिएटस,औरंगाबाद २.मे.अविष्कार ग्रुप ,अ.नगरयांनी प्रकल्प किंमतीच्या १.९५% दराने काम करणेस तयार असल्याचे कळविले आहे.तथापी प्रकल्प सल्लागार संस्था (पी.एम.सी.) पॅनेल नेमणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रकल्प किंमतीच्या १.७०% दराने काम देणेस व त्यानुसार आर्किटेक्ट पॅनेल नेमणेकामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी सादर करणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "ब" प्रमाणे प्रस्ताव व पुढील कार्यवाहीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर करणे योग्य.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार तसेच शहर अभियंता यांचे अभिप्राय प्रमाणे प्रस्तावित "अ" नुसार मा.स्थायी समिती कडे मान्यतेसाठी कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) सदर कामासाठी चा Scope of Wark काय आहे?
यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,मनपाचे आस्थापनावर आर्किटेक्ट(वास्तु विशारद) हे पद नाही.किंवा समतुल्य पद देखील नाही.
पॅनेल नेमणुक ही खर्चिक बाब नसुन फक्त मनपाला आवश्यकतेनुसार वैषिष्ठपुर्ण वास्तुविशारद विषयक काम करावयाचे झाल्यास त्यावेळी पॅनेलवरील एका आर्किटेक्ट काम देवून मंजूर दराने काम करता येते.
आज रोजी वास्तुविशारद विषय कामे प्रस्तावित करावयाची आहेत.त्यामध्ये प्रमुख्याने प्रोफेसर कॉलनी संकुल,नेहरू मार्केट संकुल,सावेडी एन.सी.सी.ग्रउंड संकुल व या सारखे मनपाला उत्पन्न देणारे प्रस्ताव तयार करावयाचे आहेत.व आशा प्रकारचे कामे करताना अदयावत व बाजारात स्पर्धात्मक दृष्या मनपाचे प्रकल्प चांगले होण्याचे दृष्टीने चांगले प्रकारचे आर्किटेक्ट आवश्यक आहे.

उक्त प्रमाणे अहवाल मान्यतेस्तव सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.
यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,आर्कीटेक्ट पॅनेलने काय काम करायचे आहेत हे त्याचे Scope of Work मध्ये अपेक्षीत होते व त्याचे (जॉब वर्क ) काय आहे? हे नमुद करावे.
यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय की,निविदा अटी शर्ती मधील पा.क्र.१८ मध्ये अे.-२ मधील नमुदप्रमाणे Scope of Work आहे.सदर ई - निविदा नोटीस सोबत जोडत आहे.
यावर मा.शहर अभियंता यांची स्वक्षरी.
मा.उपायुक्त (सा) प्रस्तावित केल्याप्रमाणे कामाची स्थळपहाणी करणे विकास योजनेशी अनुरूप प्रस्ताव तयार करणे,निविदा प्रक्रियेसाठी सहाय्य ,कामाचे सुपरव्हिजन,MB रेकॉर्डीग , बिलींग आणी फायनल कंम्प्लीशन तयार करणे व ॲक्युपेशन सर्टफिकेट इ.कामे करणेस (समकक्ष PMCप्रमाणे असल्याने ) व शा.नि.४ -२०१८ मधील दिलेल्या टप्यानुसार (मंजुर निविदा नुसार) कार्यवाही होणेसाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास व मान्यतेस्तव सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.

मा.सौ.वंदना ताठे :- हनुमान कॉलनी परीसरामध्ये वेळोवेळी सांगुनही पाणी सुधारणा होत नाही.नागरीकांना वेळेवर पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही.वरंवार विषय मांडुनही प्रश्नी मार्गी लागत नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- फेज -२ चा सर्व्हे झाला तेव्हा काही भागामध्ये लोकवस्ती नव्हती,आज लोकवस्ती वाढ झाल्याने त्या ठिकाणी फेज-२ ची कामे झालेली नाही.तेथील नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नाही.

जल अभियंता श्री.निकम :- फेज -२ च्या सर्व्हेमधून राहिलेल्या भागाकरीता स्वतंत्र्य तरतुद करण्यात आलेली आहे.त्यानुसार वाढीव भागामध्ये कामे करण्यात येणार आहेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- हनुमान कॉलनी येथील काम प्रधान्याने करा.

पाणी पुरवठा प्रमुख श्री.सातपुते :- दहा दिवसांमध्ये काम करून घेतो ,सदर कामाचे एस्टीमेंट केलेले आहे.

मा.सभापती साहेब :- पुढच्या सभेपुर्वी सदर काम झालेले पाहिजे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- वाघ मळा येथे लाईनला फक्त वॉल टाकणे बाकी आहे.वॉल टाकून लाईन चालू करा.

मा.श्री.गणेश कवडे :- शहरी गांवठाण भागामध्ये सुध्दा फेज-२ चे काम बाकी आहे.

मा.जल अभियंता श्री.निकम :- शहरी भागामध्ये ब-याच ठिकाणी फेज-२ च्या लाईन टाकून झालेल्या आहेत,त्या व्यतीरीक्त ज्या ज्या ठिकाणी कामे राहिलेली असतील त्यांचे एस्टीमेंट करून कामे मार्गी लावू.

मा.श्री.मुदस्सर शेख :- महालक्ष्मी उदयान मधील लाईट बाबत माहिती देण्यात यावी.

इले.विभाग श्री.कोके :- शहराच्या विविध भागामध्ये ठेकेदारामार्फत इले.लाईट बसविण्याचे काम चालू आहे.६० वॅट चे बल्फ उपलब्ध नसल्याने काही ठिकाणी ४० वॅट व २५ वॅट बल्फ बसविण्यात आलेले आहेत.२ महिन्यापासुन मटेरियल उपलब्ध झालेले नाही.

मा.श्री.मुदस्सर शेख :- संपुर्ण शहरातील फिटींग चे काम दिलेले असताना आत्तापर्यत काम पुर्ण झालेले नाही.सध्या बसविलेल्या फिटींग नुसार दरमहा येणारे लाईट बिल कमी झाले आहे किंवा कसे?

इले.विभाग श्री.कोके :- फिटींग बसविण्याचे काम चालू आहे.काही ठिकाणी मिटर बसविलेले नाही.काही तांत्रीक अडचणीमुळे वेळेत काम झालेले नाही.

मा.सभापती साहेब :- आज अखेर किती फिटींग बसविल्या ,पुढील समिती होईपर्यत सर्व ठिकाणी फिटींग बसविल्या गेल्या पाहिजे.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- महालक्ष्मी उदयान महानगरपालिकेने ठेकेदाराला चालविण्यासाठी दिलेले आहे.सदर गार्डनमधील लाईट चालू ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे ? माझ्या मते ठेकेदाराची जबाबदारी असावी. विद्युत विभागाकडील ठेकेदार संस्थेकडून महालक्ष्मी उद्यानामध्ये लाईट बसविण्यास माझा विरोध आहे.उद्यानामध्ये लाईट बसविण्याची जबाबदारी उद्यान चालविणा-या ठेकेदाराने करावी.

गार्डन विभाग प्रमुख श्री.नजान :- महालक्ष्मी उदयान मध्ये ठेका देण्याअगोदर महानगरपालिकेने लाईट लावल्या आहेत.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- महालक्ष्मी उदयान ठेकेदाराकडे देते वेळी आहे त्या स्थीतीमध्ये उदयान चालविण्यास दिलेले आहे.उदयानामधील लाईट ची जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराची आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- नालेगांव भागामध्ये ब-याच ठिकाणी लाईट लावलेल्या दिसुन येत नाही.

इले.विभाग श्री.कोके : - सध्या मटेरियल उपलब्ध नसल्यामुळे काम करून घेता येत नाही.मटेरियल आल्यानंतर तातडी पाहून काम करून घेवू.

मा.सभापती साहेब :- विषयाची माहिती सांगा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिके अंतर्गत राबविण्यात येणारे विविध विकास कामांचे प्लॉन तयार करणे करीता आर्किटेक यांचे पॅनल नेमणे आहे.

मा.सभापती साहेब :- मागील काही काळामध्ये एक पॅनेल तयार केले होते.त्यात आणि या नविन पॅनेल मध्ये काय फरक आहे?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- कोणतेही विकास कामे करतांना जागेनुसार व मंजूरी नुसार प्लॉन तयार करणे, साईट व्हिजीट करणे,प्लॉन मंजूर करून घेणे,नगररचना विभागाची परवानगी घेणे,टेंडर काढणे,कामावर सुपरव्हिजन करणे ,सदर कामाचे बील काढणे संपुर्ण प्रोजेक्ट पुर्ण करणे ही सर्व जबाबदारी संबंधीत पॅनेल ची असेल.

मा.सभापती साहेब :- पॅनेलला जबाबदारी ठरवून दया.सदर नियुक्त पॅनेला काम दयावे किंवा कसे, का इतर दुस-या आर्किटेकला काम देता येईल किंवा कसे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- पॅनेल नियुक्त केल्यानंतर दुस-याला काम देता येणार नाही.ऐकावेळी एकच पॅनेल मंजूर करता येईल.

मा.सभापती साहेब :- ठराविक ठेकेदार घेवू नका.मा.स्थायी समिती च्या मान्यतेने इतर ठेकेदारालाही काम देता येईल हे पहा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- एकदा पॅनेल मंजूर केल्यानंतर पुन्हा दुसरा ठेकेदार पॅनेल घेता येणार नाही.

मा.सभापती साहेब :- पॅनेलवरील आर्किटेनी समाधानकारक काम केले नाही तर,महानगरपालिकेची विकास कामे व्यवस्थती होणार नाहीत.तताडीने दुसरे आर्किटेक नेमणे बाबत तरतुद करून ठेवा.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- पॅनेल नेमल्यानंतर दुसरे आर्किटेक डायरेक्ट घेता येणार नाहीत.मा.स्थायी समिती समोर विषय घेवूनच दुसरे पॅनेल नेमावे लागेल.

मा.सभापती साहेब :- कमीत कमी दराची निविदा भरून काम चांगले होईल का?भविष्यात गरज पडली तर हया पॅनेलला सोडून नविन लोक घेता आले पाहिजेत.सध्या दररोज नविन नविन तंत्रज्ञान येत आहे. नविन नविन अत्याधुनिक यंत्र सामुग्रीचा समावेश होत आहे. तंत्रज्ञानामधील बदला नुसार आपण सुध्दा बदलले पाहिजे.एखादी अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली मोठया शहातील संस्था किंवा आपल्याला चांगली वाटणारी संस्था याच दराने काम करण्यास तयार असेल तर त्या संस्थेस काम देण्यास काय हरकत आहे.? प्रस्तावातील अटी व शर्ती करतांना त्यामध्ये या प्रस्तावातील आर्किटेक पॅनेल व्यतिरीक्त पात्र असलेली संस्था याच दराने काम करण्यास तयार असल्यास रितसर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करून व मंजूरी घेवून त्या संस्थेस काम देता येईल अश्याप्रकारे अटी व शर्ती मध्ये समावेश करून बदल करण्यात यावा.जेणे करून आपल्याला पॅनेल व्यतीरीक्त चांगल्या वाटणा-या संस्थेस सुध्दा काम देता येईल.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कार्यालयीन खर्च (बाहययंत्रणा) सन २०२१ -२२ अंतर्गत आर्किटेक्ट पॅनल नेमणे निविदा क्र.७२८९२० या निविदेतील प्रकल्प सल्लागार संस्था (पी.एम.सी.) पॅनेल नेमणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या सुचने नुसार प्रकल्प किंमतीच्या १.७०% दराने काम देणेस व त्यानुसार आर्किटेक्ट पॅनेल नेमणुक करणे या कामास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.तथापी आर्किटेक्ट पॅनेल नेमणुक करणे बाबत प्रस्तावातील अटी व शर्ती करतांना, त्यामध्ये या आर्किटेक पॅनेल व्यतिरीक्त पात्र असलेली संस्था, याच दराने काम करण्यास तयार असल्यास अश्या संस्थंचे रितसर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करून त्यास स्थायी समितीची मंजूरी घेवून त्या संस्थेस काम देता येईल अश्यास्वरूपाचे ऑफिस रिपोर्ट मधील अटी व शर्ती मध्ये समावेश करून बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख

अनुमोदक :- मा.सौ.ज्योती गाडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३

**विषय क्रमांक : ३७** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ फेर ई - निविदा क्र ७९६७९८ अहमदनगर महानगरपालिकेचे चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे (स्थापत्य कामासह विद्युत,प्लंबिंग व उद्वाहनसह) उभारणे या निविदेच्या मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

मा.सादर

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांची दि.२६/०३/२०२१

२.ई - निविदा क्रमांक ७९६७९८/ सन २०२२-२३ दि.१०/०५/२०२२(फेर ई निविदा)

३.निविदा विक्री कालावधी :- दि.१०/०५/२०२२ ते दि.२४/०५/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१०/०५/२०२२ ते दि.२४/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.२६/०५/२०२२

६. कामाची मुदत :- १८ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारस

८.जा.क्र.सां.बा.५१९ दि.०३/०६/२०२२ रोजीचे निविदा समिती बैठकीबाबतचे पत्र

९.दि.०६/०६/२०२२ रोजीच्या मा.निविदा समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | मा.निविदा समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९६७९८ | चाहुराणा बुद्रुक सर्वे नंबर ४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे (स्थापत्य कामासह विद्युत ,प्लंबिंग व उदवाहनसह) | २३,८४,३४,२३८/- | गांधी कंन्स्ट्रक्शन शिरूर | ९.९९% जादा | निविदा दराने |

वरील रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक गांधी कंस्ट्रक्शन, शिरूर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ९.९९% जादा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.सदरचे अंदाजपत्रक चालू दरसूचीनुसार म्हणजेच सन २०२१-२२ चे दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असल्याने सदर कमी दराचे निविदाधारकास मा.आयुक्त यांचे दि.०३/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेने दि.०६/०६/२०२२ रोजी दु.४.०० वा.दराचे वाटाघाटीसाठी निविदा समितीसमोर बोलाविण्यात आले.

सदर निविदा समिती बैठकीमध्ये मा.उपायुक्त(कर) तथा अध्यक्ष,मा.मुख्यलेखाधिकारी मा.मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य,मा.शहर अभियंता तथा सदस्य सचिव,निविदा समिती.संबंधित ठेकेदार गांधी कस्ट्रक्शन, शिरूर,प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.सदर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.चर्चेनुसार सदर काम ठेकेदार गांधी कंन्स्ट्रक्शन ,शिरूर यांनी निविदा रकमेपेक्षा ९.००% जादा दराने काम करणेस तयार असल्याचे सुचित केले आहे.मा.निविदा समिती सदस्यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक चालू दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असल्याने निविदा दरानुसार काम देणेस शिफारस केलेली आहे.

तरी उक्तप्रमाणे अहवाल मा.आयुक्त,म.न.पा.,अहमदनगर यांचेकडेस अवलोकनार्थ व पुढील कार्यवाहीस सादर करणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप- अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,छाननी समितीने शिफारस केले प्रमाणे प्रस्तावीत "अ" नुसार कार्यवाहीस्तव व मा.स्थायी समिती कडे पुढील कार्यवाहीस्तव .

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.निविदा समितीने नमुद केल्याप्रमाणे निविदा दरानुसार काम देणेस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क " व "ड" मधील अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सदर कामाचे ठेकेदार यांना पुन्हा बोलावून दर कमी करणे कामी चर्चा करून अंतिम अहवाल सादर करावा.

यावर उप- अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,वरिल आदेशानुसार आज दि.०७/०६/२०२२ रोजी गांधी कंन्स्ट्रक्शन यांना समक्ष बोलाविले असता त्यांचेशी झालेल्या सविस्तर चर्चे मध्ये बाजारात स्टील,सिमेंट व इतर बांधकाम साहित्याचे दर मोठया प्रमाणात वाढले असून ,डिझेल,पेट्रोल चे दर वाढीमुळे भाववाढ झालेली आहे.असे नमुद करून त्यांनी आज दि.०७/०६/२२ मा.आयुक्त यांचे दालनात समक्ष लेखी सादर करून त्यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ % जादा दराने काम करण्यास समर्थता दर्शविली आहे.तथापी निविदा २५ लक्षा पुढे असलेने मा.स्थायी समितीची निविदा मंजूरी घेणे आवश्यक आहे.परंतु संबंधिताचे निवेदनावर मा.आयुक्त व तांत्रिक छाननी समिती - चर्चा झाली.त्यानुसार कामाची प्रथमिकता,बाजारातील भाववाढीतील चढउतार तसेच ई - निविदेतील व्दितीय मागणी नंतरचा प्रतिसाद पाहता ठेकेदाराने दुस-यांदा वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराबाबत निर्णयार्थ सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.
यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी
यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांची स्वाक्षरी
यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी
यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ फेर ई - निविदा क्र ७९६७९८ अहमदनगर महानगरपालिकेचे चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे (स्थापत्य कामासह विद्युत,प्लंबिंग व उद्वाहनसह) उभारणे या निविदेच्या मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब - विषय क्र.३७ वाचण्यात यावा. तसेच या विषयाबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महा अभियांन अंतर्गत प्रभाग समिती क्र.४ मध्ये २ एक्कर जागेचा भुखंड असुन तेथे प्रायमरी शाळेचे आरक्षण आहे. सदर जागेवर प्रभाग समिती क्र. ४ चे कार्यालय आहे. तेथे पुर्वी व्यायाम शाळेची पडझड झालेली आहे. सदर जागेमध्ये गरजु गोर गरीब रुग्नांसाठी महानगरपालिकेमार्फत अद्यावत असे रुग्नालय बांधावयाचे आहे. सदरची निविदा ही रक्कम रु.२३ कोटीची असुन प्रथम निविदा मागविली असता. कोणीही निविदा भरलेली नव्हती. पुन्हा दुस-यांचा निविदा काढली असता २ निविदा प्राप्त झालेल्या आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सदर कामाकरीता मा.शासनाचा हिस्सा किती ? व महानगरपालिकेचा हिस्सा किती ? महानगरपालिकेच्या हिस्स्याचे डिपोझीट केले आहे काय ?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- चालु आर्थिक वर्षाच्या अंदाज पत्रकामध्ये सदर कामासाठी आवश्यक निधीची तरतुद केलेली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सदर कामासाठी महानगरपालिका हिस्स्याची डिपोझीट भरलेले आहे का? तशी प्रोव्हिजन केलेली आहे का?

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. चालु आर्थिक वर्षामध्ये सन २०२२-२०२३ च्या बजेटमध्ये तरतुद केलेली असुन १ वर्षाच्या कालावधी पुर्ण होणार नसल्याने त्याकरीता पुढील वर्षाच्या बजेटमध्ये तरतुद करावी लागेल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अशा महानगरपालिकेच्या हिस्स्याच्या रकमेचे किती कामांचे देयके अदा करणे बाकी आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- मागील ३-४ वर्षापासुन अशा कामांचे देयके देणे चालु आहे. साधारणता १ कोटीच्या आसपास देणे बाकी आहे.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- निधीतील मंजुर कामे झालेली असुन देयके देणे बाकी आहे.

मा.सभापती साहेब :- सदर हॉस्पीटल मध्ये किती बेड असणार व कोणकोणत्या सुविधा मनपा देणार आहे.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- सदर ठिकाणी १०० बेड असुन ५ मजली इमारत होणार आहे. ५० हजार स्को.फुट बांधकाम असुन त्यामध्ये अत्याधुनिक सर्व सुविधा एकाच ठिकाणी पुरविल्या जाणार आहे. यामध्ये फक्त सिव्हील वर्क पल्बिग, लाईटींग ची कामे आहेत.

मा.सभापती साहेब :- सदर रुग्णालयाकरीता लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे का?

मा.श्री.मुदस्सर शेख :- सदर बांधकामासाठी कालावधी किती लागणार आहे?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- मुदतीत काम करुन देणेबाबत निविदेमध्ये अट टाकण्यात आलेली आहे. सदर ठेकेदाराने ४ % वाढीव दराने काम करण्यास सहमती दर्शवीली आहे.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाचे मत काय आहे?

शहर अभियंता श्री.इथापे :- निविदा मंजूरीसाठी छाननी समितीने छाननी करून विषय पाठविला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- एस्टीमेंट दरानुसार कमीटीने मंजूरी दिली आणि ठेकेदाराने काम केले नाही तर काय करणार ?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- एस्टीमेंट दराने काम करावे ,या विषया बाबत मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

मा.उपयुक्त श्री.कुरे :- मा.आयुक्त साहेब यांचे समक्ष चर्चे नुसार वाढीव चार टक्के दराने काम करण्यास तयार असले बाबत ठेकेदाराने संमती दर्शविली आहे.चर्चे नुसार विषय मंजूरी करीता मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- ४% ने वाढी दयावयाचे किंवा कसे.

मा.श्री.शेख मुदस्सर :- सिमेंट व लोखंडाचे दर वाढल्याने वाढीव दराने काम देणे आवश्यक आहे.

मा.श्री.पाअुलबुधे विनीत :- ठेकेदाराचे म्हणणे ऐकुण घेणे योग्य होईल.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- या पुर्वीही मनपा मार्फत केलेल्या विकास कामाचे टेंडर वाढीव काम झाले आहे.

मा.सभापती साहेब :- ४% वाढी दराने देणे बाबत प्रशासनाचे काय मत आहे.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- ४% वाढीव अंतीम दर सांगीतला आहे.यावर मा.स्थायी समितीने निर्णय घ्यावयाचा आहे.

मा.सभापती साहेब :- हे बरोबर आहे काय.टेक्नीकल माहिती सांगा.कायदेशीर करता येईल का .दोन वेळा निविदा मागविली आहे.

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- ४% वाढीव दरापेक्षा कमी दराने करू शकत नसल्याबाबत ठेकेदाराने सांगीतले आहे.समक्ष बाजारामध्ये वस्तुचे दर कमी जास्त झाले तर ठेकेदारास कोणताही वाढीव मोबदला दिला जाणार नाही.अशी अट टेंडरमध्ये घातली आहे.आजच्या मंजूर मटेरीलयच्या दरानुसार काम पुर्ण होईपर्यत हेच दर राहतील\

मा.सभापती साहेब :- ४% वाढीव दराने काम देण्याचे स्थायी समितीला अधिकार आहेत का?

मा.उपायुक्त श्री.कुरे :- सदर कामा बाबत छाननीचे वेळी मा.आयुक्त साहेब यांच्या दालनामध्ये मी,मा.आयुक्त साहेब , मुख्यलेखापरिक्षक ,मुख्यलेखाधिकारी,शहर अभियंता संबंधीत ठेकेदाराबरोबर चर्चा झालेली आहे.चालू बाजार भाव व निविदेमध्ये दाखविलेले बाजार तसेच भविष्यात कमी जास्त होणारे वस्तुंचे बाजार भाव पहाता ठेकेदार ४% पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- बाजारातील वस्तुंचे कमी अधिक भावामुळे संबंधित ठेकेदार ४% पेक्षा कमी दराने काम करणार नाही.

मा.सभापती साहेब :- सदर कामाचे एस्टीमेंट कोणी तयार केले आहे.त्यामध्ये सिमेंट ,स्टील यांचे चालू भाव धरले नाहीत का?

मा.शहर अभियांता श्री.इथापे :- प्रकल्प सल्लागार समितीचे प्रतिनीधी यांनी तयार केलेले आहे.ते सभेमध्ये उपस्थित आहेत.ते माहिती देतील.

प्रकल्प सल्लागार समितीचे प्रतिनीधी श्री.समीर घायाळ :- सन २०२१-२२ च्या डी.एस.आर.नुसार एस्टीमेंट तयार करण्यात आलेले आहे.सध्या बाजारामध्ये भाव वाढलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- स्थायी समितीला निविदा दरापेक्षा जादा दराची निविदा मान्य करण्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत का?

मा.शहर अभियंता श्री.इथापे :- मा.स्थायी समितीला निविदा दरापेक्षा जास्त दराची निविदा मंजुरी बाबत निर्णय घेण्याचे अधिकार आहेत.

मा.सौ.ज्योती गाडे :- मा.आमदार साहेबांच्या माध्यमातुन गोरगरीब नागरीकांसाठी आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होतील तसेच शहरालगत असणा-या ग्रामीण भागातील नागरीकांना देखील या अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल च्या माध्यमातुन दिल्या जाणा-या सुविधांचा लाभ होणार आहे.मी मा.आ.श्री.संग्रामभैया जगताप यांचे स्थायी समितीच्या वतीने आभार व्यक्त करते.

मा.सौ.मिना चव्हाण :- मा.आमदार साहेब श्री.संग्रामभैया जगताप यांच्या प्रयत्नातुन होत असलेल्या अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल च्या माध्यमातुन गोरगरीब जनतेला आरोग्य विषयक सेवा उपबब्ध होणार असल्याने स्थायी समितीच्या वतीने आभार व्यक्त करते.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरात्थान महाअभियान सन २०२१-२२ अंर्तगत या कामा करीता पालकमंत्री मा.ना.श्री. हसन मुश्रीफ साहेब तसेच आमदार मा.श्री.संग्रामभैया जगताप यांच्या विशेष प्रयत्नातुन सदर कामा करीता आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून दिला.ही सर्वांना अभिमानास्पद बाब असून ,या कामा करीता सर्व सदस्यांनी त्यांचे आभार मानावे अशी सुचना मी कमीटीला करीत आहे.व मा.स्थायी समितीच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो.

मा.सभापती साहेब :- गोरगरीबांच्या सोईसाठी महानगरपालिकेमार्फत बांधण्यात येत असलेल्या हॉस्पीटल बांधकामा साठी विशेष निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल मा.उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार साहेब,पालकमंत्री मा.श्री.हसन मुश्रीफ साहेब तसेच आमदार मा.श्री.संग्रामभैया जगताप यांचे आभार मानतो.

मा.श्री.गणेश कवडे :- सध्या बाजारामध्ये बांधकाम साहित्याचे भाव वाढलेले आहेत. या गोष्टीचा विचार करता प्रशासनाच्या वतीने निविदाधारक गांधी कंस्ट्रक्शन, शिरूर यांचा प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- मा.आयुक्त व तांत्रिक छाननी समिती सदस्य यांच्या मध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सुचित केल्यानुसार कामाची प्रथमिकता,बाजारातील भाववाढीतील चढउतार तसेच ई -निविदेतील व्दितीय मागणी नंतरचा प्रतिसाद पाहता ठेकेदाराने दुस-यांदा प्रशासनाशी केलेल्या वाटाघाटी अंती निविदाधारक गांधी कंस्ट्रक्शन, शिरूर यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ फेर ई - निविदा क्र ७९६७९८  अहमदनगर महानगरपालिकेचे चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे (स्थापत्य कामासह विद्युत,प्लंबिंग व उद्‌वाहनसह) उभारणे या कामा करीता काढलेली निविदा त्यामधील दर तसेच बाजारातील भाव वाढ याचा विचार करता प्रशासनाने कायदेशीर नियमाचे पालन करून काम करण्यास प्रशासनाच्या वतीने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ फेर ई - निविदा क्र ७९६७९८  अहमदनगर महानगरपालिकेचे चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूग्णांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे (स्थापत्य कामासह विद्युत,प्लंबिंग व उद्‌वाहनसह) उभारणे या कामाचे  निविदाधारक गांधी कंस्ट्रक्शन, शिरूर यांना समक्ष बोलाविले असता त्यांचेशी झालेल्या सविस्तर चर्चे मध्ये बाजारात स्टील,सिमेंट व इतर बांधकाम साहित्याचे दर मोठया प्रमाणात वाढले असून डिझेल,पेट्रोल चे दर वाढीमुळे भाववाढ झालेली आहे.असे नमुद करून त्यांनी मा.आयुक्त यांचे दालनात समक्ष लेखी सादर करून त्यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४ % जादा दराने काम करण्यास समर्थता दर्शविली आहे. मा.आयुक्त व निविदा समिती तथा तांत्रिक छाननी समिती चे उपायुक्त (सा) तथा अध्यक्ष,मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य, शहर अभियंता तथा सदस्य सचिव यांच्या मध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सुचित केल्यानुसार कामाची प्राथमिकता,बाजारातील भाववाढीतील चढउतार तसेच ई - निविदेतील व्दितीय मागणी नंतरचा प्रतिसाद पाहता,गांधी कंस्ट्रक्शन, शिरूर यांच्याशी दुस-यांदा वाटाघाटी अंती प्रशासनाच्या वतीने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

कायदेशीर व  नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३

**विषय क्रमांक : ३८** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वाहनचालक यापदी ओंकार राजेंद्र सैंदाणे व प्रशांत सिकंदर वाकरे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** मोटर व्हेईकल विभाग यांचेकडील जा. क्र. १ दि. ०१/०४/२०२२ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोटर व्हेईकल विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. ०१ दि. ०१/०४/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये" मोटर व्हेईकल विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वाहनचालक (हलके वाहन) यापदी १) ओंकार राजेंद्र सैंदाणे २) प्रशांत सिंकदर वाकरे यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ३१/०८/२०२१ पासून सहा महिन्यांकरिता असुन सदरची मुदत ही दि. २८/०२/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

मोटर व्हेईकल विभागाकडील यापुर्वीच्या जा. क्र. १८८ दिनांक १५/०७/२०२१ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटर व्हेईकल विभागामध्ये वाहनचालकांची कार्यरत कर्मचा-यांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात असल्याने ड्रायव्हर पदांची तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकता झाल्याने मोटर व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करुन दिनांक २९/०७/२०२१ रोजीच्या दैनिक नगर स्वतंत्र व दिनांक ३०/०७/२०२१ रोजीच्या दैनिक नगर सह्याद्री या वर्तमानपत्रामध्ये जाहीराती प्रसिध्दीस देवून उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मा. निवड समिती मार्फत मुलाखती होवुन पात्र उमेदवारांची निवड केलेली होती, त्यानुषंगाने पात्र उमेदवार १) ओंकार राजेंद्र सैंदाणे २) प्रशांत सिंकदर वाकरे यांची जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक २८५१ दिनांक ३१/०८/२०२१ चे आदेशानुसार दिनांक ३१/०८/२०२१ पासून सहा महिन्यांकरिता रु. १५,५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्तीनुसार मोटर व्हेईकल विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती, सदर आदेशानुसार केलेल्या मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दिनांक ०१/०३/२०२२ पासून समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वाहनचालक (हलके वाहन) यापदी १) ओंकार राजेंद्र सैंदाणे २) प्रशांत सिंकदर वाकरे यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ०४/०३/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता रुपये १५,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर

त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.तसेच प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करणेत यावे.

प्रस्तावित मोटार व्हेईकल विभागासाठीपुढील मुदत वाढ देताना उपरोक्त परिपत्रकाची अवलोकन करून कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,"अ" व "ब " प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" व "ब " प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर निर्णयासाठी पाठविण्यास मान्यतेस सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वाहनचालक यापदी ओंकार राजेंद्र सैंदाणे व प्रशांत सिकंदर वाकरे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट्र वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.ज्योती गाडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वाहनचालक यापदी ओंकार राजेंद्र सैंदाणे व प्रशांत सिकंदर वाकरे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवे साठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वाहनचालक यापदी ओंकार राजेंद्र सैंदाणे व प्रशांत सिकंदर वाकरे यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख

अनुमोदक :- मा.सौ.ज्योती गाडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

**विषय क्रमांक : ३९** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ ई - निविदा क्र ७८९२७३ अहमदनगर महानगरपालिकेचे माळीवाडा सर्व्हे नं.४९/२ अ/१ ,४९/२अ/२ आणि ४९/३ब,८४ आर,अंतर्गत स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणे या निविदेच्या मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांची दि.२४/०३/२०२१

२.ई - निविदा क्रमांक ७८९२७३/ सन २०२२-२३ दि.१२/०४/२०२२

३.निविदा विक्री कालावधी :- दि.१२/०४/२०२२ ते दि.०६/०५/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१२/०४/२०२२ ते दि.०६/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०९/०५/२०२२

६. कामाची मुदत :- ६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील दि.३०/०५/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारस

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | सर्वात कमीचे निविदाधारक | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | मा.निविदा समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८९२७३ | माळीवाडा सर्व्हे नं.४९/२ अ/१ ,४९/२अ/२ आणि ४९/३ब,८४ आर,अंतर्गत स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणे | ३,४२,९८,४१०/- | बी.बी.मोरे संगमनेर | निविदा दराने | बी.बी.मोरे संगमनेर निविदा दराने |
| | | | राजमुद्र इंफ्रा संगमनेर | १०.००% जादा | |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक बी.बी.मोरे ,संगमनेर,यांची सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी बी.बी.मोरे,संगमनेर यांची निविदा दराने आलेली ई - निविदा मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता सार्व.बांधकाम विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरिल कामासाठी प्राप्त निविदापैकी स्पर्धात्मक दृष्या सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयार्थ मा.स्थायी समितीसमोर सादर करणे योग्य वाटते.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण -७ मधिल नियम ७३(क) प्रमाणे मा.स्थायी समिती समोर कार्यवाही करणे कामी कार्यवाहीस्तव सादर.

प्रस्तावित "अ" नुसार अंदाजपत्रकीय दराने निविदाकाराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ ई - निविदा क्र ७८९२७३ अहमदनगर महानगरपालिकेचे माळीवाडा सर्व्हे नं.४९/२ अ/१ ,४९/२अ/२ आणि ४९/३ब,८४ आर,अंतर्गत स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणे या निविदेच्या मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.सभापती साहेब :- या विषयाची माहिती सांगा.

उप अभियंता श्री.निंबाळकर :- दोन एकर जागेमध्ये अत्याधुनिक पध्दतीचे खेळाचे क्रिडांगण विकसीत करणे आहे.त्या मध्ये बास्केट बॉल,हॉली बॉल व तसेच योगा साठी सुसज्ज हॉल बांधावयाचा आहे.

मा.सभापती साहेब :- सदर कामा करीता निधी उपलब्ध आहे का?

उप अभियंता श्री.निंबाळकर :- जिल्हा नियोजन समितीकडील निधी वापरण्यात येणार आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- सदर क्रिडांगणाचे सर्व कामे एक वर्षाच्या आत पुर्ण होतील का?

उप अभियंता श्री.निंबाळकर :- एका वर्षाच्या आत काम पुर्ण होईल.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ ई - निविदा क्र ७८९२७३ अहमदनगर महानगरपालिकेचे माळीवाडा सर्व्हे नं.४९/२ अ/१ ,४९/२अ/२ आणि ४९/३ब,८४ आर,अंतर्गत स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणे या कामा करीता निविदाधारक बी.बी.मोरे ,संगमनेर यांची स्पर्धात्मक दृष्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०२१-२२ ई - निविदा क्र ७८९२७३ अहमदनगर महानगरपालिकेचे माळीवाडा सर्व्हे नं.४९/२ अ/१ ,४९/२अ/२ आणि ४९/३ब,८४ आर,अंतर्गत स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणे या कामा करीता निविदाधारक बी.बी.मोरे ,संगमनेर यांची स्पर्धात्मक दृष्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसर पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३

**विषय क्रमांक : ४०** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. इलेक्ट्रीक विभाग २९ दि. २२/०४/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. १२/१०/२०२१ ते ११/०४/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि. १२ / ०४ / २०२२ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १३५ दिनांक ०१/११/२०२१ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३९४५ दि. १०/१२/२०२१ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची रु. १४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १२/१०/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे, सदर नियुक्तीची मुदत ही दि. १२/०४/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून सय्यद इकबाल सुलेमान यांची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,मु.ले.अ. व मु.ले.प.यांचा अभिप्राय घ्यावा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या

कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.तसेच प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करणेत यावे.

प्रस्तावित वायरमन पदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करावी.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,अं.ले.प. यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,विद्युत विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार व वरील शिफारशिनुसार मा.स्थायी समितीसमोर निर्णसासाठी ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे निर्णयास्तव पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.ज्योती गाडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत च्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.सौ.ज्योती गाडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

**विषय क्रमांक : ४१** **दिनांक :- १०/०६/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सुभाष बापुराव सुळ व इतर ७ यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :-** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा. क्र. २८ दि. २२ / ०४ / २०२२ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील संदर्भिय प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी दर्शविलेल्या संबधितांची मानधनावर नियुक्ती केलेली असुन त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु. | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी | मुदत समाप्त दि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.३९० दि. ०४/०२/२०२२ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ३ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ४ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ५ | अंकित किशोर कासवा | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ६ | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ७ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.२१३६ दि. ०६/०७/२०२१ | ०३/१२/२०२१ ते ०२/०६/२०२२ | दि.०३/०६/२०२२ पासून |
| ८ | खान शादाब रफिक | वायरमन | १४,२५०/- | जा.क्र.३९२ दि. ०४/०२/२०२२ | २३/११/२०२१ ते २२/०५/२०२२ | दि.२३/०५/२०२२ पासून |

वरील दर्शविल्याप्रमाणे एकूण ८ वायरमन यांची मुदत वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवुन ६ महिन्याकरीता मुदतवाढीस मंजुरी मिळणेस " नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४४ दिनांक ११/०१/२०२२ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३९० दि. ०४/०२/२०२२ अन्वये सुभाष बापुराव सुळ व इतर यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि. ०३/१२/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता व जा. क्र. आस्था. करारबध्द

नेमणुक ३९२ दि. ०४/०२/२०२२ अन्वये खान शादाब रफीक यांची मानधनावर तांत्रिक खंड देवून दि. २३/११/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता व अटी व शर्तीनुसार दरमहा रुपये १४,२५०/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीची मुदत ही अनुक्रमे दि. ०३/०६/२०२२ व २३/०५/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार वरील तक्त्यामधील श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करिता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मु.ले.प. व मु.ले.अ.यांचा अभिप्राय घ्यावा.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५ "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.तसेच प्रस्तावात मुळ नियुक्ती दिनांक नमुद करणेत यावे.

प्रस्तावित वायरमन पदी पुढील मुदत वाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करावी.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,अं.ले.प.यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,विद्युत विभाग प्रमुख व मु.ले.अ. व अं.ले.प.यांचे अभिप्रायानुसार - निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,विद्युत विभाग प्रमुख यांच्या मागणीनुसार सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सुभाष बापुराव सुळ व इतर ७ यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.ज्योती गाडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्ट मधील तक्त्यामधील नमुद श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत च्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्ट मधील तक्त्यामधील नमुद श्री. सुभाष बापुराव सुळ व इतर यांची इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत च्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.सौ.ज्योती गाडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका